25 वर्षे
विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/ ८५९/२०२६-२७ दि.१३/०७/२०२६

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

महोदय,

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

**दि.१३/०७/२०२६**

मिरा-भाईंदर शहरातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था व औद्योगिक आस्थापनांना कळविण्यात येते की, हवामानातील बदल (Climate Change) तसेच 'एल निनो (El Niño)' सारख्या जागतिक हवामानविषयक घटनांमुळे पावसाचे प्रमाण व वितरण अनियमित होत असून, काही वर्षांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता निर्माण होते. परिणामी धरणांतील पाणीसाठा कमी होऊन भविष्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक इमारत, गृहनिर्माण संस्था, शासकीय व खासगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच औद्योगिक आस्थापनांनी आपल्या इमारतीवरील छतावर पडणारे पावसाचे पाणी वर्षाजल संधारण (Rain Water Harvesting) प्रणालीद्वारे भूजल पुनर्भरणासाठी वापरणे अत्यंत आवश्यक आहे.

वर्षाजल संधारणाचे प्रमुख फायदे :

- भूजल पातळी वाढण्यास मदत होते.
- विहिरी व बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधारते.
- भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होते.
- पावसाचे पाणी वाया जाण्यापासून बचाव होतो.
- शहरी भागात पाणी साचणे व पूरस्थिती कमी होण्यास मदत होते.
- पर्यावरण संवर्धन व जलसुरक्षेस हातभार लागतो.

मिरा-भाईंदर महानगरपालिका सर्व नागरिकांना आवाहन करते की, "पावसाचे पाणी अडवा, जमिनीत मुरवा आणि भावी पिढ्यांसाठी जलसुरक्षा निर्माण करा."

"आज जपलेला प्रत्येक थेंब, उद्याची पाणीटंचाई टाळेल."